दि.१२/०७/२०२४.    प्रकरण क्रं. :— ४१०/पीएस/२०१९

साक्षीदार क्रं.:—०१    निशाणी क्रं. :— ०७

माझे नाव :— निशांत नामदेव धुरी

वय :— ३३ वर्षे. कामधंदा :— पी.एस.आय.

सध्या राहणारा :— कलिना पोलिस वसाहत, मुंबई.

<u>सरतपास सरकारी अभियोक्ता श्री प्रसाद जोशी यांच्या मार्फत</u>

दि.०७.१०.२०१८ रोजी मी पोलिस उपनिरीक्षक म्हणुन पोलिस ठाणे वाकोला येथे कार्यरत होतो. त्यादिवशी रात्री ०८.०० ते सकाळी ०८.०० या वेळेत पोलिस ठाणे अमलदार पदाचा कार्यभार होता. रात्री ०२.३० वा. शशिकांत साठे पोलिस हवालदार यांनी अपघाताची वर्दी दिली. त्यांनी अशी वर्दी दिली कि, नवीन आग्रीपाडा येथे नाकाबंदी चालु असतांना काही इसम बेदरकारपणे गाडी चालवत होते त्याप्रमाणे मी त्यांची फिर्याद नोंदवुन अपराध क्र. ३८३—२०१८ प्रमाणे नोंदवुन घेतली. आता मला फिर्याद दाखविली त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास नि.०८ देण्यात आली. अपघातातील गाडी रोहित गुरव चालवत होता. ती गाडी जप्त केली. आरोपीला अटक केली. आरोपीने गाडी बेदरकारपणे चालविल्याचे निष्पन्न झाल्यामुळे दोषारोप पत्र दाखल केले. आरोपी पाहिल्यास ओळखु शकतो. अटक पंचनाम्यावरील फोटो आरोपीचा आहे.

सरतपास संपला.

<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री तिवारी यांच्यामार्फत</u>

२. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने माझे खोटी फिर्याद दिली. आरोपीकडुन गाडीचे नोंदणी प्रमाणपत्र, विमा, लाइसन्स अशी

12/7/24

कागदपत्रे जप्त केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी बेदरकारपणे गाडी चालवत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस कर्मचारी यांचे व्यतिरिक्त अन्य जबाब नोंदवले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विरुध्द खोट दोषारोप पत्र दाखल केले आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

उलटतपास संपला.
फेर तपास नाही.

(अ. भा. जाधव)
महानगर/प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
७१ वे न्यायालय, बांद्रा, मुंबई.

दि.१२/०७/२०२४.

## फौजदारी व्यवहार संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचे बयान

आरोपीचे नाव :— रोहीत रमेश गुरव.
वय :— ३६ वर्षे
व्यवसाय :— नोकरी
राहणार :— विले-पार्ले मुंबई

| | |
|---|---|
| प्र.१ | तुम्हांला अभियोग पक्षाचा पुरावा समजला का? |
| उत्तर | होय. |
| | |
| प्र.२ | सा.क्र.१ निशांत नामदेव धुरी यांच्या बयानात असे आले की, दि. ०७/१०/२०१८ रोजी, ते पो.ऊ.नि. म्हणून पोलीस ठाणे —वाकोला येथे कार्यरत होते. त्यादिवशी रात्री ०८.०० ते सकाळी ०८.०० यावेळेत पोलीस ठाणे अंमलदार पदाचा कार्यभार असताना रात्री ०२.३० वाजता, पोलीस हवालदार शशिकांत साठे यांनी अपघाताची वर्दी दिली की, नवीन आग्रीपाडा येथे नाकाबंदी चालू असताना काही इसम बेदरकारपणे गाडी चालवत होते त्याप्रमाणे त्यांनी त्यांचा अपराध क्र.३८३/२०१८ प्रमाणे फिर्याद (नि.क्र.८) नोंदवून घेतली. याबाबत तुम्हांला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | हे खोटे आहे |
| | |
| प्र.३ | सा.क्र.१ यांच्या बयानात पुढे असे आले की, अपघातातील वाहन तुम्ही चालवत होता. ते वाहन जप्त केले. तुम्हांला अटक केली. तुम्ही वाहन बेदरकारपणे चाललवल्याचे निष्पन्न झाल्यामूळे दोषारोप पत्र दाखल केले. अटक पंचनामावरील आरोपी/तुमचा फोटो त्यांनी ओळखला आहे. याबाबत तुम्हांला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | हे खोटे आहे |
| | |
| प्र.४ | साक्षीदार तुमच्या विरूध्द का साक्ष देतात? |
| उत्तर | माहित नाही। |
| | |

| | |
|---|---|
| प्र.५ | तुम्हांला बचावाचा पुरावा दयायचा आहे का? |
| उत्तर | नाही |
| | |
| प्र.६ | तुम्हांला खटल्याबाबत अजुन काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर | खटला खोटा आहे. |
| | |

..............
आरोपीची सही.
दि.२५/०९/२०२५.
सराद.

( अ. भा. जाधव )
प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी,
७१वे न्यायालय, बांद्रा, मुंबई.
दि.२५/०९/२०२५.

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीने दिलेली उत्तरे माझ्या समक्ष आणि आरोपीच्या विधिज्ञांच्या उपस्थितीत, आरोपीच्या सांगण्याप्रमाणे पुर्ण सत्यतेने नोंदविण्यात आली आहे.

दि.२५/०९/२०२५.
सराद.

( अ. भा. जाधव )
प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी,
७१वे न्यायालय, बांद्रा, मुंबई.
दि.२५/०९/२०२५.